

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रा. एन. डी. पाटील यांना प्रदान करताना खा. शरद पवार. सोबत डॉ. बी. एन. खोत, सरोज पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदिवडेकर आदी. (छाया : एस. अली)

# एन.डी. निर्मळ जीवनाचा आदर्श : खा. शरद पवार

## विद्यापीठातर्फे प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी आयुष्यभर समाजातील शेवटच्या घटकाचे अश्रू पुसण्याचे काम केले. कधीही वैयक्तिक स्वार्थ पाहिला नाही, संकुचित विचार केला नाही. शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवीवर्गासाठी ते आयुष्यभर झटले. कधीही विचारांशी प्रतारणा केली नाही. त्यांचे विचार नव्या पिढीला कायमपणे प्रेरणादायी ठरतील. एन.डी. म्हणजे निर्मळ जीवनाचा आदर्श असल्याचे गौरवोद्गार खासदार शरद पवार यांनी शनिवारी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. एन. डी. पाटील यांच्या सौभाग्यवती सरोज पाटील यांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उपकुलसचिव नांदिवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मानपत्राचे वाचन डॉ. भारती पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. बी. एन. खोत यांनी केले. या सोहळ्याचा प्रारंभ प्राचार्य रा. कृ. कणबरकर

▶▶ पान २ वर..

### रयत हाच माझा श्वास

डॉ. एन. डी. पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचा आढावा घेताना शाळा कशा उभारल्या, कोणत्या कठीण प्रसंगातून वाटचाल झाली, याबाबतच्या प्रवासाचे धावते वर्णनच केले. त्याचबरोबर रामकृष्ण वेताळ खैरमोडे गुरुजींचे स्मृती मंदिर उभारण्यासाठी आपल्याला मिळालेल्या पुरस्काराची दीड लाखाची रक्कम आणि संस्थेचे रयतचे दहा लाख घालावेत, अशी विनंती करत रयत ही शिक्षण संस्थाच आपला श्वास आणि ध्यास असल्याचे सांगितले.

# एन.डी. निर्मळ जीवनाचा आदर्श : खा. शरद पवार

**(पान १ वरुन)** यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाला. डॉ भरती पाटील यांनी लिहिलेले 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' आणि शिवाजी विद्यापीठाच्या दैनंदिनीचे प्रकाशन खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले.

खा. पवार म्हणाले, ज्या काळात शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती, त्या काळात त्यांनी शिक्षणाची कास धरली. जिद्द तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आशीर्वाद लाभल्याने ते उच्चविद्याविभूषित झाले. सामाजिक जीवनात एन. डी. यांनी शेवटच्या घटकाच्या संघर्षासाठी लढायचे ही भूमिका जपली. २२ वर्षे विधिमंडळातील पदाचा उपयोग सातत्याने सामान्य माणसासाठी केला. देश स्वतंत्र झाल्यानंतर खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांपर्यंत हे स्वातंत्र्य पोहोचविण्याच्या हेतूने केशवराव जेधे आदी मंडळींनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. विशिष्ट विचार घेऊन चळवळ चालवली. शेतकरी, कामगारवर्गाचे प्रश्न मांडले. एन. डी. पाटील यांना या विचारांचे आकर्षण होते. या विचारांप्रतीच त्यांनी आयुष्य वेचले.

पवार म्हणाले, आम्ही दोघे मेहुणे-पाहुणे; मात्र विधिमंडळाचे ते विरोधी पक्षनेते, तर मी सत्ताधारी आघाडीचा मंत्री होतो. घरगुती संबंधांचा त्यांनी वैचारिक विरोध करताना कधीच विचार केला नाही. पुलोद सरकारच्या काळात ते माझ्या मंत्रिमंडळात सहकारमंत्री होते. आतापर्यंत विरोधी बाकावरून काम करणाऱ्या एन.डी. यांनी मंत्रिपदाचा उपयोग त्याच तळमळीने शेवटच्या घटकासाठी केला. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र मार्केट करण्याचा निर्णय घेतला. बाजार समित्यांचा पाया घातला. शिक्षणाचा आकृतिबंध करताना गरिबांना प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी धोरण ठरवले. तत्कालीन शिक्षण सचिव चित्रा नाईक यांनी तो आकृतिबंध तयार केला होता. गरिबांना शिक्षणाची दारे बंद करणाऱ्या धोरणाविरोधात त्यांनी राज्यभर रान उठवले. शासनाला आकृतिबंध मागे घेण्यास भाग पाडले. आकृतिबंधाच्या चित्रामागील नायक कोण, हे त्यांचे वाक्य त्या काळी खूप गाजले. शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी कायम संघर्ष केला. शेतकऱ्याला न्याय मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

प्रा. एन. डी. पाटील यांनी प्राचार्य कणबरकर यांच्या स्मृतींना उजाळा दिला. ते म्हणाले, रयत शिक्षण संस्थेचाही पुरस्कार मला दिला, तो घेण्याचे मला भाग्य लाभले. आज दुसरे कारण तोच पुरस्कार मला दुसऱ्यांदा देण्याचे विद्यापीठाच्या आणि कणाबरकर कुटुंबीयांच्या वतीने देण्याचे प्रयोजन केले. पंधरा दिवस मला अनेक लोक विचारायचे, मला ओळखलं का? या वेदना मला जाणवत होत्या; मात्र २ जानेवारी रोजी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीला मराठीचा जागर घातला, त्यावेळी मी उद्घाटन करण्यासाठी आलो. मी औपचारिकता म्हणून उद्घाटनाचे भाषण केले. मी बोलोलो. मला आज या सभेत बोलायला मला बळ मिळाले. कणबरकर सर आणि माझे संबंध हे वडीलभावाचे होते. त्यांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये आंतरिक बंध होते, असेही ते म्हणाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित असलेले विविध क्षेत्रातील मान्यवर. (छाया : एस. अली)

## मला कुणाचा व्हीप चालत नाही

डॉ. एन. डी. पाटील हे अधिक तपशीलवार बोलत होते. यावेळी त्यांच्या प्रकृतीची काळजी वाटत असल्याने पत्नी सरोज पाटील यांनी चिठ्ठी देत आवरते घ्या, असे म्हटले. यावर एन. डी. म्हणाले, याबाबत मला कुणाचाही व्हीप चालत नाही. कुणाचा म्हणजे कुणाचाही नाही. रयत या विषयावर मी बोलणारच, तर शरद पवार म्हणाले, डॉ. एन. डी. पाटील हे माझे मोठे मेहुणे. एका वळणार राजकीय परिस्थितीत आम्ही विरोधक; पण त्यांची प्रश्नांची मांडणी ही अफलातून आणि शेवटच्या घटकाचा विचार करणारी असायची. त्यांची भूमिका ठाम, त्यामुळे त्यांच्यासमोर कुणाचाच व्हीप चालायचा नाही. आताच अनुभव आला, माझ्या बहिणीचे काही चालले नाही, तिथे आमच्या व्हीपचे काय.

## आयुष्याबद्दल समाधानी : एन.डी.

एन. डी. म्हणाले, कणबरकर यांना राजर्षी शाहू महाराजांबद्दल कृतज्ञता होती. त्यांचे हात कापत होते, तरीही त्यांनी त्यांचे 'ग्लिम्पसेस ऑफ शाहू महाराज' हे पुस्तक लिहिले आणि हे शेवटचे असल्याचे सांगितले. आणि या पुस्तकाला मी प्रस्तावना द्यावी, असे त्यांनी सांगितले. मी या पुस्तकाला प्रस्तावना लिहून काढली. मला ९२ वर्षे झाली आहेत. वय खरे आहे. ते मान्यच केले पाहिजे. मला निसर्गाने जे दिले आहे ते स्वीकारतो. मला थोडासा हात कापला तर वाईट वाटत नाही. मला ९२ वर्षे जगायला मिळाले यात मी समाधान मानतो.

## गुरूंचे आभार

एन. डी. म्हणाले, ज्या रयत शिक्षण संस्थेत जन्मलो, वाढलो आणि माझ्या गावापासून आष्टा गावात न्यू इंग्लिश स्कूल, आष्टा-वाळवा या शाळेत मला शिक्षणाची संधी मिळाली. जर संधी मिळाली नसती तर मला शिक्षणाविना राहावे लागले असते. घरची परिस्थिती बऱ्यापैकी होती, त्यामुळे मला माझ्या आजोबांनी शाळेत घातले. त्यामुळे मी शिकलो. बागणी गावचे परीट गुरुजी हे पहिले शिक्षक मिळाले. ते माझ्या भाग्याचे ठरले. परीट गुरुजींचा मी ऋणी आहे. आष्ट्याला एका जिद्दी माणूस जो इंग्रजीतून ऑनर्स पास झालेला, अशा रामकृष्ण वेताळ खैरमोडे यांनी रयत शिक्षण संस्थेत न्यू इंग्लिश स्कूल काढण्याचे ठरवले. या शाळेच्या आवारात खैरमोडे गुरुजींचे स्मृती स्मारक उभ राहावे यासाठी पुरस्काराची रक्कम देत असल्याचे जाहीर केले. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार व चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी एन.डी. यांच्या आवाहनानुसार या रकमेत दहा लाखांची भर घालत स्मारक उभारण्याचे जाहीर केले.

जनसंपर्क कक्ष
13 JAN 2019 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एन. डी. पाटील यांच्या मनात मधुकणांची रुंजी - शरद पवार

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**जनहितासाठी लढण्याचा** प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या मनातील मधुकण कधीही संपणार नाही, अशा काव्यात्मक शब्दांत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रा. डॉ. पाटील यांचा शनिवारी येथे गौरव केला.

शिवाजी विद्यापीठात खासदार शरद पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांना प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

जनआंदोलन आणि चळवळीला आयुष्य समर्पित केलेल्या प्रा. पाटील यांच्या कार्याचा आणि वयाच्या ९३व्या वर्षीही धीरोदात्तपणे लढण्याच्या बाण्याचा पवार यांनी मुक्तकंठाने गौरव केला. त्यासाठी पवार यांनी कविवर्य भा. रा. तांबे यांच्या कवितेतील ओळी उद्धृत केल्या. ' मधू मागसि माझ्या सख्या परी, मधूघटची रिकामी पडती... आता मधूचे नाव कासया, लागले नेत्र रे पैलतीरी' असे तांब्यांनी म्हटले असले तरी प्रा.पाटील यांचा या वयातील उत्साह पाहता त्यांच्या जीवनातील ना मधुकण कधी संपतील, ना कधी त्यांनी संघर्ष करण्याची पत्करलेली सामाजिक बांधीलकी!




**ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांना प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार प्रदान करताना शरद पवार.**

विधिमंडळात प्रा. पाटील अभ्यासपूर्ण विचार मांडायचे, असा उल्लेख करून पवार म्हणाले, की त्यांनी नेहमीच गोरगरिबांचे दुःख पुसण्यासाठी प्रयत्न केले. वसंतदादा यांच्या मंत्रिमंडळातून आम्ही बाहेर पडलो. मुख्यमंत्रीपदाची धुरा माझ्याकडे आली. पाटील हेही मंत्रिमंडळात होते. अभ्यासपूर्ण मांडणी कशी करायचे हे त्यांच्याकडून आम्ही शिकलो, अशी कबुली पवार यांनी दिली.

प्रा. पाटील म्हणाले, की मी जिथे शिकलो तेथे आता बारावीपर्यंतची शाळा आहे. त्या शाळेत खैरमोडे यांची आहुती पडली. खैरमोडे सरांचे स्मृतिमंदिर तेथे उभे करायचे आहे. त्यासाठी पुरस्काराची दीड लाख रुपयाची देणगी रयत शिक्षण संस्थेकडे देत आहे. हा धनादेश स्वीकारून पवार यांनी रयतेचे दहा लाख रुपये घालून स्मारक उभारण्यात येईल अशी घोषणा केली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. मानपत्र वाचन डॉ. भारती पाटील यांनी केले.

लोकमत

# लढवय्या नेत्याचा रा. कृ. कणबरकर स्मृती पुरस्काराने सन्मान...!




आदित्य वेल्हाळ

कोल्हापुरात शनिवारी शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर स्मृती पुरस्कार देऊन शानदार समारंभात सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, डॉ. बी. एन. खोत व शारदाबाई पवार अध्यासनाच्या प्रमुख डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या. - वृत्त/२

## शानदार सोहळ्यात कणबरकर पुरस्कार प्रदान : प्रा. पाटील यांचे कार्य नव्या पिढीला प्रेरणादायी

# पवार यांच्या तोंडून 'एन.डीं.'ची संघर्षगाथा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : समाजातील उपेक्षित आणि शेवटच्या माणसाच्या हितासाठी संघर्ष करणे, त्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे हेच प्रा. एन. डी. पाटील यांच्या जीवनाचे सूत्र राहिले आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी येथे काढले. एक शिक्षणतज्ज्ञ, एक कष्टकऱ्यांच्या चळवळीचा नेता, निष्कलंक राजकारणी, सीमा प्रश्नासाठी हाकेला धावून जाणारा हक्काचा माणूस अशी एन. डी. यांच्या चौफेर कर्तृत्वाची गाथाच पवार यांनी सूत्रबद्धपणे मांडली व त्यातून एन.डी. यांचा जीवनसंघर्षच त्यांनी नेमक्यापणाने उभा केला. एन.डी. जे महाराष्ट्राच्या सार्वनिक जीवनात जगले ते नव्या पिढीला कायमच मार्गदर्शक राहील, असे पवार यांनी सांगितले. नात्याने मेव्हणे-पाहुणे असलेल्या, परंतु वैचारिक व राजकीय भूमिका वेगळ्या असलेल्या पवार यांच्या हस्ते एन. डी.सर यांचा सत्कार होत असल्याने त्याबाबत जनमानसातही कुतूहल होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित शानदार समारंभात प्रा. एन. डी. पाटील यांना पवार यांच्या हस्ते प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार देऊन सन्मानित केले. दक्षिण महाराष्ट्रातून आलेले विविध स्तरांतील मान्यवर, चळवळीतील कार्यकर्ते, सीमालढ्यातील कार्यकर्ते 'रयत' परिवारातील सदस्य आणि एन. डी.प्रेमींनी यावेळी तुडुंब गर्दी केली होती. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

एन. डी. पाटील यांच्या चौफेर कार्याचा आढावा पवार यांनी अत्यंत अचूक शब्दांत मांडला. ते म्हणाले, 'एन. डी. पाटील यांनी चोवीसहून अधिक वर्षे विधिमंडळात काम केले; परंतु या कालावधीत त्यांनी पदाचा उपयोग सामान्य माणसाच्या आयुष्यामध्ये चांगले दिवस यावेत यासाठीच केला. त्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडले. स्वातंत्र्यानंतर समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी सत्ताधाऱ्यांची विचारसरणी पुरेशी नाही, असे मानणारा एक वर्ग काँग्रेसमधून बाहेर पडला आणि त्यांनी 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना केली. कोल्हापूर तर या पक्षाचे आगर होते. एन. डी. पाटील यांनी ही विचारसरणी स्वीकारली आणि आयुष्यभर ते या पक्षात कार्यरत आहेत. आपल्या वैचारिक भूमिकेला त्यांनी कधीच बटा लागू दिला नाही.'

विधिमंडळामध्ये त्यांच्या भाषणातील एक-एक शब्द कानांत कोरून ठेवला जायचा. कोणताही वैयक्तिक स्वार्थ न ठेवता, संकुचित विचार न मांडता सामान्यांचे अश्रू पुसण्याची आग्रही मांडणी ते करत असत. विरोधी पक्षात असताना त्यांनी ज्या तडफेने सरकारला धारेवर धरले, त्याच तडफेने मंत्री झाल्यावर प्रशासन राबविले व सत्तेचा उपयोग समाजातील शेवटच्या माणसाच्या हिताकरिता केला. माझ्या मंत्रिमंडळामध्ये ते सहकारमंत्री होते तेव्हा सर्व बाजार समित्यांना त्यांनी शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत देण्यासाठी आग्रह धरला. रात्री बारा-एक वाजता जाऊन त्यांनी कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत मिळतात का याची खातरजमा करून घेतली. देशभरात कुठेही नसलेली 'कापूस एकाधिकार योजना' प्रभावीपणे राबविण्याचे काम एन. डी. पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत केले. आयुष्यामध्ये विविध महाविद्यालयांना महत्वाचे स्थान मिळवून देणाऱ्या रा. कृ. कणबरकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार अशाच एका सामान्यांसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या व्यक्तीला दिला गेला याबद्दल मी विद्यापीठाचे आभार मानतो.

व्यासपीठावर सरोज पाटील, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. डॉ. बी. एन. खोत यांनी प्रास्ताविक केले. कणबरकर कुटुंबीयांतर्फेही प्रा. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या डॉ. भारती पाटील यांनी संपादित केलेल्या 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, प्रा. एन. डी. पाटील यांचे जीवन म्हणजे मानवी मूल्यांची समरगाथा असून, त्यांना पुरस्कार देताना विद्यापीठाचाच गौरव झाला आहे. कार्यक्रमाला भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील, माजी आमदार के. पी. पाटील, वैभव नाईकवडी, प्रा. जे. एफ. पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, शिक्षण मंडळाचे सभापती अशोक जाधव, सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा पत्की, क्रांतिकुमार पाटील, ए. वाय. पाटील, भैया माने, आर. के. पोवार, भालबा विभूते यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. महेंद्र कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.




आदित्य वेल्हाळ

कोल्हापुरात शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित शानदार समारंभात प्रा. एन. डी. पाटील यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सत्कारानंतर प्रा. एन. डी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सोबत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि सरोज पाटील उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात प्रा. एन. डी. पाटील यांच्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला समाजातील विविध स्तरांतील मान्यवर, कार्यकर्त्यांनी तुडुंब गर्दी केली होती.

### बहिणीचा व्हिप चालला नाही, आमचा काय चालणार?

- पवार म्हणाले, नारायणराव हे माझे मेहुणे, माझ्या मोठ्या बहिणीचे यजमान आणि मी कुटुंबात लहान. मी मंत्रिमंडळात आणि हे विरोधी पक्षनेते. त्यामुळे त्यावेळी कठीण परिस्थिती होती.
- जिथे आमच्या बहिणीचा व्हिप चालला नाही, तिथं आमचा व्हिप काय चालणार? आम्ही तसा कधी प्रयत्नही केला नाही, असे पवार म्हणताच जोरदार हशा पिकला.

### 'रयत' माझा श्वास

सत्काराविषयी कृतज्ञता व्यक्त करताना एन. डी. पाटील यांनी आपल्या उत्तम स्मरणशक्तीचा दाखला दिला. १९३९ च्या आठवणी सांगत त्यावेळचे वातावरणच त्यांनी आपल्या भाषणातून उभे केले. ते म्हणाले, रयत शिक्षण संस्था ही माझ्या आयुष्यातील सुवर्णक्षण आहेत. रयत माझा श्वास आहे, रयत माझा ध्यास आहे.

### यांचा दिवस कधी ढळणार नाही

एन. डी. पाटील यांचा अनेकवेळा 'नारायणराव' असा उल्लेख करीत शरद पवार यांनी त्यांच्या अनेक आठवणी जागविल्या. भा. रा. तांबे यांच्या कवितेचा दाखला देत 'यांचा (एन. डी.) दिवस कधी ढळणार नाही, विचारांचा मधुघट कधी रिता होणार नाही' अशा काव्यमय शब्दांत पवार यांनी एन. डी. यांचे वर्णन केले.

### रक्कम खैरमोडेंच्या स्मारकासाठी

१ लाख ५१ हजार रुपये, मानपत्र आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरुप होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे आवडते विद्यार्थी रामकृष्ण वेताळ खैरमोडे यांचे आष्टा (जि. सांगली) येथील शाळेत स्मारक व्हावे, अशी माझी इच्छा आहे, असे सांगत एन. डी. पाटील यांनी पुरस्काराचा निधी या स्मारकासाठी दिला. यावेळी पाटील यांच्या इच्छेनुसार यामध्ये 'रयत'चे १० लाख रुपये घालून हे स्मारक उभारणार असल्याचे पवार आणि 'रयत'चे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी जाहीर केले.

### खणखणीत आवाजात ४० मिनिटे भाषण

काही दिवसांपूर्वी आवाज उमटत नसताना त्यातून बरे झालेल्या एन. डी. पाटील यांनी तब्बल ४० मिनिटे खणखणीत शब्दांत भाषण केले. त्यामध्ये वैचारिक स्पष्टता होती. उत्तम स्मरण होते. भाषण थोडे लांबले म्हणून त्यांना थांबण्याची विनंती पत्नी सरोज यांनी केली. त्यावर एन.डी यांनी त्यांच्या मूळ स्वभावानुसार 'या विषयावर मला कुणाचा रेट चालत नाही; अगदी कुणाचा म्हणजे कुणाचाच!' असे स्पष्ट करत भाषण सुरुच ठेवले. यावेळी उपस्थितांनी त्यांना टाळ्या वाजवून दाद दिली. खैरमोडे या शिक्षकांबद्दल त्यांच्या मनात किती अपार श्रद्धा होती याचेच प्रत्यंतर त्यातून आले.

**एन.डीं.चे खरे घर कोणते? :** एन. डी. पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेविषयीच्या बांधीलकीविषयी बोलताना पवार म्हणाले, एन. डी. यांची दोन घरे आहेत. एक म्हणजे माझ्या बहिणीचे घर आणि दुसरे म्हणजे रयत शिक्षण संस्था. मात्र, त्यातील त्याचं खरं घर कुठलं, हे सांगता येणार नाही. पवार यांच्या या वाक्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा शनिवारी प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने गौरव करताना राष्ट्रवादीचे अध्यक्ष व खासदार शरद पवार. शेजारी डावीकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, डॉ. बी. ए. खोत.

# संघर्षाची भूमिका हे 'एन.डीं'चे सूत्र

## शरद पवार; डॉ. पाटील यांचा प्राचार्य कणबरकर पुरस्काराने गौरव

कोल्हापूर, ता. १२ : सामान्यांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी संघर्षाची भूमिका घेणे हेच ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या जीवनाचे सूत्र आहे. प्रकृती ठीक नसली तरी शेतकऱ्यांची प्रकृती ठणठणीत राहावी, यासाठी ते झटत असून, त्यांचे विचार भावी पिढ्यांचे समाजमन घडविण्यासाठी प्रेरक ठरतील, असे गौरवोद्‌गार राष्ट्रवादीचे अध्यक्ष व खासदार शरद पवार यांनी आज येथे काढले.

शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. एन. डी. पाटील यांना श्री. पवार यांच्या हस्ते प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने आज गौरविण्यात आले. एक लाख ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पान १ वर »

सकाळ

# संघर्षाची भूमिका 'एन.डीं'चे सूत्र

पान १ वरून

या वेळी प्रा. डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते सरोज पाटील यांचा साडी-चोळी देऊन सत्कार झाला. तसेच, डॉ. भारती पाटील संपादित 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या पुस्तकासह विद्यापीठाच्या दैनंदिनीचे प्रकाशन झाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. लोककला केंद्रात कार्यक्रम झाला.

श्री. पवार यांनी डॉ. पाटील यांच्या संघर्षमय जीवनाचे पदर उलगडत उपस्थितांशी संवाद साधला. शेतकरी, कामगार, कष्टकऱ्यांविषयी असणारी त्यांची तळमळ मांडली. ते म्हणाले, "ज्या काळात जुन्या पिढीला शैक्षणिक सुविधा नव्हत्या, शिक्षणाचा विचार नव्हता, ऐपत नसल्याने चौथी-पाचवीपर्यंत शिक्षण घेतले जात होते, शिक्षणाची संधी ही केवळ मर्यादित घटकांना होती, त्या काळात जिद्द, शिक्षकांची प्रेरणा, कुटुंबीयांची साथ व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर एन.डी. उच्चविद्याविभूषित झाले. ते कर्मवीरांचे आवडते विद्यार्थी. त्यांचा स्वभाव व पार्श्वभूमी ही संघर्षाची असल्याने हेच पुढे त्यांच्या जीवनाचे सूत्र बनले. सार्वजनिक जीवनात त्याचे प्रतिबिंब पडले. कोल्हापूरकरांच्या बळावर विधानसभेचे सदस्यत्व मिळाल्यानंतर सातत्याने त्या पदाचा वापर त्यांनी सर्वसामान्यांच्या व्यथा मांडण्यासाठी केला. त्यांची राजकीय विचारधारा ही डावी, शेतकरी कामगार पक्षासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले."

ते म्हणाले, "एकाधिकार कापूस योजना देशात कुठेच नव्हती. कापूस पिकाला किंमत मिळत नव्हती. सहकार खात्याचे मंत्री असताना एन. डी. यांनी ही योजना मंजूर केली. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला किंमत मिळते का? हे कृषी उत्पन्न बाजार समितीत जाऊन पाहण्याची जबाबदारी घेतली. शिक्षण हाही त्यांचा आवडता विषय. त्या काळात त्यांनी शिक्षणाच्या आकृतिबंधाच्या विरोधात महाराष्ट्रात जनजागृती करीत सरकारला अक्षरशः फोडून काढले. ज्याच्यात कुवत त्यानेच शिकायचे, असे त्याचे स्वरूप होते. एन. डी.च्या पाठपुराव्याने सरकारला आकृतिबंधाचे धोरण बदलावे लागले. शिक्षणाचा अधिकार सर्वांना देण्यामागचे योगदान त्यांचे आहे."

सामान्यांच्या पदरात न्यायाचे माप पाडण्यासाठी एन. डी. काम करीत आहेत. सीमाप्रश्नाची अस्वस्थता मात्र त्यांच्या मनात आजही कायम आहे. मराठी भाषिकांची सोडवणूक करण्यासाठी अखंडपणे त्यांनी काम केले आहे. ते उच्च प्रकारचे व्यक्तिमत्त्व असून, सीमावासीयांच्या प्रेमाचा ओलावा त्यांना मिळाला आहे. यापुढेही त्यांचे विचार सामाजिक मन घडवत राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, माजी आमदार के. पी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वैभव नायकवडी, ए. वाय. पाटील, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भालबा विभुते, भय्या ऊर्फ प्रताप माने, व्ही. बी. पाटील, माजी प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, डॉ. क्रांतीकुमार पाटील, माजी महापौर आर. के. पोवार, माजी नगरसेवक आदिल फरास, ग्रंथपाल नमिता खोत, उपस्थित होते. डॉ. बी. ए. खोत यांनी प्रास्ताविक केले.

**विचारांचा मधूघट रिता होणार नाही...**

एन. डी. शंभरी नक्कीच गाठतील. त्यांचा दिवस कधी ढळणार नाही. विचारांचा मधूघटही कधी रिता होणार नाही, असे सांगत श्री. पवार म्हणाले, की माझ्या बहिणीला एन.डीं.ना कधी-कधी थांबा म्हणून सांगावे लागते. पण, ते हवे त्या पद्धतीने जीवन जगणारे आहेत. आमच्याकडून काही चूक झाली तर झोडतीलही.

**व्हीप चालला नाही**

एन.डी. हे माझे मेहुणे. बहिणीचे यजमान. मी मंत्री असताना ते विरोधी पक्षाचे नेते. त्यादरम्यान कठीण प्रसंग आले. आमचा 'व्हीप' त्यांच्यासमोर चालला नाही, असे त्यांनी मनमोकळेपणे सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरणप्रसंगी लोककला केंद्रात उपस्थित नागरिक.

## मंत्रिमंडळातही 'एन.डीं'ची छाप

श्री. पवार म्हणाले, की विधिमंडळात १९७८ मध्ये काँग्रेसमध्ये मतभेद झाले. त्या वेळी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील होते. मी मंत्रिमंडळातून बाहेर पडलो आणि राज्याची धुरा माझ्याकडे आली. नव्या मंत्रिमंडळाची यादी करताना एन. डी. यांच्या नावासाठी सर्व जण आग्रही होते. त्यांनी त्यास संमती दिली आणि त्यांच्याकडे सहकार खात्याचे काम दिले. अनेकदा त्यांची भाषणे ऐकली होती. मात्र, मंत्रिमंडळ व प्रशासनात त्यांनी कामाची छाप पाडली. काम हातात घेतलं की ते १०० टक्के पूर्ण करण्याची त्यांची हातोटी राहिली.

सकाळ

# रयत शिक्षण संस्था श्वास, जीवनाचा ध्यास

## डॉ. एन. डी. पाटील यांचे भावोद्‌गार; कर्मवीर भाऊरावांमुळे शिक्षण केले पूर्ण

**कोल्हापूर, ता. १२ : ''कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आष्टा येथे शाळा सुरू केली म्हणून माझे शिक्षण झाले. शिक्षक रामकृष्ण वेताळ खैरमोडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत शाळा चालवली. परीट मास्तरांच्या आग्रहामुळे कुटुंबाचा विरोध असताना मी मॅट्रिक पास झालो. यानंतर मी रयत शिक्षण संस्थेचा एक भाग बनलो. 'रयत'मधील कालावधी हा जीवनातील सुवर्णकाळ आहे. रयत संस्था हाच माझ्या जीवनाचा श्वास आणि जगण्याचा ध्यास आहे,'' असे भावोद्‌गार ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी काढले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी झालेल्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरणानंतर मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील. शेजारी डावीकडून शरद पवार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील.

श्री. पाटील यांना शिवाजी विद्यापीठातर्फे प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी डॉ. पाटील यांनी आपल्या भावनांना वाट करून दिली. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते श्री. पाटील यांना गौरविण्यात आले.

श्री. पाटील म्हणाले, की माझ्या कुटुंबातील आई, वडील, आजोबा हे सर्वच निरक्षर होते. घरात शिक्षणाचे वातावरण नव्हते. सांगली जिल्ह्यातील आष्टा येथे शाळा नव्हती. माझ्या लहानपणी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नांतून गावात शाळा सुरू झाली. विशेष म्हणजे रामकृष्ण खैरमोडे या दलित तरुणाने शाळेची जबाबदारी स्वीकारली. खैरमोडे यांनी त्या काळात मुंबई विद्यापीठातून इंग्रजी विषयात बी.ए. केले होते. परीट मास्तरांमुळे मी मॅट्रिक होऊ शकलो. खैरमोडे, परीट या शिक्षकांमुळेच माझे शिक्षण झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अतिशय कष्टाने या खेडोपाड्यांच्या शाळा चालविल्या. त्यामुळेच माझ्यासारखी बहुजनांची मुले शिकली. पुढे कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेची जबाबदारी माझ्याकडे दिली. आणि रयत संस्था जीवनाचा श्वास आणि ध्यास बनली.

पुरस्काराबद्दल ते म्हणाले, की प्राचार्य कणबरकर हे मला वडीलभावासारखे होते. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांची ज्ञानसाधना सुरू होती.

अखेरच्या टप्प्यात त्यांच्या हातांना कंप सुटला होता. त्यांनी त्याही परिस्थितीत 'प्रोग्रेसेस ऑफ राजर्षी शाहू छत्रपती' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याची विनंती त्यांनी मला केली. मीही ती लिहिली. त्यांनी जमवलेली सर्व पुंजी विद्यापीठाला दिली. त्यांच्यासारखा माणूस आता होणार नाही.

### खैरमोडेंचे स्मारक उभारावे

श्री. पाटील यांनी पुरस्काराची एक लाख ५१ हजारांची रक्कम आष्टा शाळेजवळ खैरमोडेंचे स्मारक बनविण्यासाठी रयत संस्थेला दिली. तसेच, आणखी दहा लाख घालून स्मारक बांधावे, अशी विनंती केली व धनादेश शरद पवार यांना दिला. श्री. पवारांनी हा धनादेश संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्याकडे दिला.

13 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या पिढीला एन. डीं. चे विचार प्रेरणादायी

## ज्येष्ठ नेते शरद पवार, आर.के. कणबरकर पुरस्काराने एन. डी. पाटील सन्मानित

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी आजपर्यंत समाजातील शेवटच्या घटकांच्या डोळ्यातीलत अश्रु पुसण्याचे काम केले. आमदार, मंत्रीपद, विरोधी पक्ष नेते याचा वापर त्यांनी कष्टकरी, शेतकरी यांच्या शेतीमालास भाव मिळवून देणे, शोषितांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच केला. आयुष्यभर आपल्या विचारांशी ते ठाम राहिले. ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील यांचे हे विचार नव्या पिढीला प्रेरणादायी आहेत असे मत ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले.

-शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना यंदाचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी सरोज पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बी. एन. पाटील प्रमुख उपस्थित होते. मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले.

प्रा. पाटील यांनी विधीमंडळातल्या आपल्या पदाचा उपयोग सदैव समाजातल्या शेवटच्या घटकाच्या व्यथा सोडविण्यासाठी केला. प्रा. पाटील यांनी मंत्री म्हणून आणि प्रशासक म्हणून आपली उत्तम छाप पाडली. काम हातात घेतलं की, ते शंभर टक्के यशस्वी झालंच पाहिजे आणि त्यातून सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन झालंच पाहिजे, अशी त्यांची भूमिका असायची. कापूस एकाधिकार योजना, स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना हे त्यांच्या कारकीर्दीतील अतिशय महत्त्वाचे आणि यशस्वी निर्णय. शेतकऱ्यांसाठी त्यांनी सातत्यानं आग्रही आणि आक्रमक भूमिका घेतली. असे गौरवोद्‌गार शरद पवार यांनी काढले.

यावेळी प्रा. एन.डी. पाटील यांनी रयत शिक्षण संस्था आपल्या जीवनाचा श्वास आणि ध्यास आहे. रयत शिक्षण संस्थेशी आपण ज्या क्षणाला जोडले गेलो तो क्षण सुवर्ण असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' या डॉ. भारती पाटील संपादित ग्रंथाचे प्रकाशन झाले. प्राचार्य डॉ. बी. ए. खोत यांनी प्रास्ताविक केले. महेंद्र कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी आर. के. कणबरकर पुरस्काराने सपत्नीक सन्मानित करण्यात आले. यावेळी सरोज पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नादवडेकर, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बी. एन. खोत, प्रा. भारती पाटील आदी.**

### पुरस्काराची रक्कम गुरुवर्य खैरमोडे यांच्या स्मृतीमंदिरासाठी

रामकृष्ण खैरमोडे यांनी आष्टा येथील न्यू इंग्लीश स्कूलमध्ये तळमळीने सेवा केली. गुरूवर्य खैरमोडे यांचे आष्टा येथे स्मृतीमंदिर उभारावे, अशी भावना व्यक्त करून त्यासाठी पुरस्काराच्या रकमेपोटी देण्यात आलेली १ लाख ५१ हजार रुपयांची रक्कम रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे सुपूर्द केली. त्यानंतर पवार यांनी आपल्या भाषणा दरम्यान संस्थेचे चेअरमन अनिल पाटील यांना व्यासपीठावर बोलावून संस्थेच्या वतीने या पुरस्काराच्या रकमेत आणखी दहा लाख रुपयांची भर घालून खैरमोडे यांचे स्मारक उभारण्यात येईल, याची ग्वाही दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2019
Times of India

# ND Patil donates ₹1.5L award money to education society

Amit Gadre



Patil receives the award from Pawar at the SUK on Saturday

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Ninety-two-year-old ND Patil was on Saturday conferred the Professor RK Kanbarkar Award set up by Shivaji University. The award comes with a citation and cash reward of Rs1.5 lakh. Patil donated the prize money to Rayat Shikshan Sanstha.

Speaking on the occasion, Nationalist Congress Party (NCP) chief Sharad Pawar said touching the lives of the poor was always a passion for Patil, who began his public life as a student at college. He was a minister in the state government in the 1970s, and has led several agitations seeking betterment of the lives of the poor and marginalized.

Pawar said it was appropriate that Patil should be conferred the award in memory of the vice chancellor of the university, a propagator of progressive ideas of Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Babasaheb Ambedkar. Pawar is also president of the Rayat Shikshan Sanstha.

In his acceptance speech, Patil said Rayat Shikshan Sanstha played a major role in his life, providing opportunities for education in remote villages. He said he remembered his teachers and would like to donate the award money to set up a memorial in the name of one of his teachers who taught him at one of the schools founded by Rayat Shikshan Sanstha.

"Patil was co-operative minister in my government," Pawar said, recalling that he set up agriculture produce market committees and regulated these so that farmers were not cheated. He was also a champion of quality education for all, Pawar said, adding that even at the 92 Patil remains deeply committed to the cause of farmers and was on the streets only recently to protest the hike in power tariff that would affect farmers adversely. "Patil is also the strength behind Marathi-speaking people of Belgaum who are fighting for inclusion of the Marathi-speaking region in Maharashtra," Pawar said.

जनसंपर्क कक्ष
13 JAN 2019 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याहस्ते शनिवारी प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर डावीकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, डॉ. पी. ए. खोत व डॉ. भारती पाटील. ▸▸ वृत्त...३

# 'विचारांचा मधुघट रिता होणार नाही'





शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार प्रदान कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ नेते शरद पवार. समोर उपस्थित जनसमुदाय.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शेती, सहकार, शिक्षण क्षेत्रात काम करताना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी नेहमीच सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळवून दिला. सीमा बांधवाच्या लढ्यात अद्याप यश आले नसल्याने त्यांच्यामध्ये अस्वस्थता असली तरी त्यांनी नेहमीच मराठी भाषिकांना प्रेमाचा ओलावा दिला. आगामी काळातही समाजमन तयार करण्याची जबाबदारी ते समर्थपणे पेलतील. विचारांचा मधुघट कधी रिता होणार नाही' असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला. त्यासाठी पवार यांनी त्यांच्या दीर्घआयुष्याची प्रार्थनाही केली.

शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. एन. डी. पाटील यांचा प्राचार्य डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्काराने गौरव झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. सरोज पाटील, रयत परिवारातील मान्यवरांच्या उपस्थितीत लोककला केंद्राच्या सभागृहात भावपूर्ण वातावरणात पुरस्कार वितरण झाले. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व धनादेश असे पुरस्काराचे स्वरुप होते. पवार यांच्या हस्ते डॉ. पाटील यांचा गौरव झाला.

शरद पवार म्हणाले, 'डॉ. पाटील यांनी आजपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचे अश्रू पुसण्याचे काम केले. कधीही वैयक्तिक स्वार्थ पाहिला नाही. संकुचित विचार केला नाही. शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी ते झटत आहेत. त्यांनी कधीही विचारांशी प्रतारणा केली नाही. त्यांचे विचार नव्या पिढीला प्रेरणादायी ठरतील. ज्या काळात शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती, त्यावेळी त्यांनी शिक्षणाची कास धरली. जिद्द आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आशीर्वाद लाभल्याने ते उच्च विद्याविभूषित झाले. सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतल्यानंतर शेवटच्या घटकाला न्याय देण्यासाठी त्यांनी संघर्षाची भूमिका कायम ठेवली. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून त्यांनी लोकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संघर्षाची भूमिका मांडली.'

## डॉ. एन. डी. पाटील यांचा कणबरकर पुरस्काराने सन्मान

आठवणींना उजाळा देताना प्रा. डॉ. पाटील म्हणाले, 'गेल्या काही दिवसांपासून प्रकृती अत्यंत खालवली. शरीरातील सोडियमचे प्रमाण नको तितक्या पातळीपर्यंत घटल्याचा परिणाम स्मरणशक्तीवर झाला. त्यामुळे भेटायला आलेल्या अनेकजणांनी मला ओळखलं का? असे विचारल्यानंतर वेदना होत होत्या. पण, दोन जानेवारीला विद्यापीठातील वि. रा. शिंदे जयंतीनिमित्तच्या कार्यक्रमात औपचारिक भाषण केले. त्या भाषणामुळे आजचे बळ मिळाले. गेल्यावेळी प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार रयत संस्थेला मिळाल्यानंतर तो स्वीकारण्याचे भाग्य मला मिळाले. आता पुन्हा हा पुरस्कार स्वीकारण्याचे भाग्य लाभले. कणबरकरांचे आणि माझे संबंध वडिलभावाचे होते. त्यामुळे पुरस्काराचा नम्रतापूर्वक स्वीकार करतो.'

कुलगुरु डॉ. शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. पवार यांच्या हस्ते शारदाबाई गोविंद पवार अध्यासन केंद्राच्यावतीने डॉ. भारती पाटील संपादीत 'कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया' पुस्तकाचे व विद्यापीठाच्या दैनंदिनीचे प्रकाशन करण्यात आले. गौरव समारंभास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नमिता खोत यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. भारती पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. पी. ए. खोत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### गुरूबद्दल कृतज्ञता

. डॉ. पाटील यांनी शैक्षणिक वाटचालीत पांडुरंग परीट गुरुजी आणि महाविद्यालयीन शिक्षणात रामकृष्ण खैरमोडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्याचे स्पष्ट करत कृतज्ञता व्यक्त केली. खैरमोडे यांचे आष्टा येथील महाविद्यालयामध्ये स्मारक म्हणून स्मृतीमंदिर उभारण्यासाठी पुरस्काराचा दीड लाखांचा धनादेश 'रयत'चे अध्यक्ष पवार यांच्याकडे सुपूर्द करत उर्वरीत दहा लाखांचा निधी देण्याची विनंती केली. पवार यांनीही मनोगतानंतर दीड लाखांचा धनादेश चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्याकडे देत उर्वरीत दहा लाखांचा निधी देण्याची घोषणा केली.

### व्हीप काढण्याचा कधी प्रयत्न केला नाही

'डॉ. पाटील हे मोठ्या बहिणीचे पती असल्याने नात्याने ते मेहूणे लागतात. वयाने लहान असूनही मी मंत्रीपदावर असताना ते विरोधी पक्षनेते होते. त्यामुळे अनेकदा कठिण प्रसंगातून जावे लागले. पण आमचा 'व्हीप' कधी त्यांच्यावर चालला नाही आणि काढण्याचा प्रयत्नही केला नाही' असे पवार यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला.

### 'यावर याचिका चालत नाही'

एन. डी. पाटील यांचे भाषण नेहमी अत्यंत मुद्देसूद असते. आजही गौरव समारंभावेळी तसेच भाषण सुरू होते. मात्र भाषण लांबल्याचे लक्षात आल्यावर सरोज पाटील (माई) यांनी त्यांना थांबविण्यासाठी कागद देताच, 'यावर याचिका चालत नाही' असे डॉ. पाटील म्हणताच सभागृह पुन्हा हास्यकल्लोळात बुडाले.

# पुढारी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांना प्रदान करताना ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार. व्यासपीठावर डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, प्राचार्य बी. ए. खोत आदी. (छाया : पप्पू अत्तार)

पुढारी

# एन.डी. यांनी सामान्यांच्या हिताची भूमिका मांडली

## शरद पवार यांचे गौरवोद्गार; प्राचार्य कणबरकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शेतकरी, कामगारांसह उपेक्षित माणसांसाठी प्रा. एन. डी. पाटील हे आजही वयाच्या ९२ व्या वर्षातही संघर्ष करत आहेत. शेती, सहकार, शिक्षणासह सर्वच क्षेत्रात त्यांनी उत्तुंग काम केले आहे. आयुष्यभर सामान्य माणसाच्या हिताची भूमिका मांडून, त्या पद्धतीची धोरणे राबवण्यासाठी त्यांनी सरकारला भाग पाडले. नव्या पिढीसाठी प्रा. पाटील यांचे जीवन आदर्शवत आहे,

### विचारांचा मधुघट रिता होणार नाही

'यांचा दिवस कधी ढळणार नाही, विचारांचा मधुघट कधी रिता होणार नाही', अशा काव्यमय शब्दांत शरद पवार यांनी ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांच्या संपूर्ण कारकीर्दीचा गौरव केला. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री, ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी शनिवारी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्राचार्य आर. के. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांना खा. पवार यांच्या हस्ते देण्यात आला. विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात खा. पवार बोलत होते. खा. पवार आणि प्रा. पाटील यांचे नाते मेहुणे-पाहुण्याचे असल्याने या पुरस्कार सोहळ्यातील भाषणांतून दोघांच्या नात्यांमधील कौटुंबिक जिव्हाळ्याचा पदर उलगडला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. सौ. सरोज (माई) पाटील, प्रा. बी. ए. खोत आदींसह

पान ७ वर ▶

13 JAN 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठ नागरिक हे कुटुंब संस्थेचे आधारवड

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : भुदरगड तालुका ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे 'भुदरगड भूषण व आदर्शमाता' पुरस्कार सोहळा

**प्रतिनिधी**

गारगोटी

समाजामध्ये ज्येष्ठांचे स्थान महत्वाचे असुन आधारवड असणाऱ्या वृद्धांमुळे कुटूंब संस्था टिकून रहाते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

भुदरगड जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेतर्फे देण्यात येणारा "भुदरगड भूषण" पुरस्कार कलनाकवाडी (ता. भुदरगड) गावचे ज्येष्ठ नागरीक बाबुराव जिजाजी निंबाळकर यांना तर गारगोटी नगरीच्या माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्त्या वृषाली आनंदराव देसाई, शैलजादेवी कारखानीस यांना 'आदर्शमाता" पुरस्कार डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. गारगोटी येथील इंजुबाई सभागृहात हा सोहळा पार पडला.

यावेळी आमदार प्रकाश आबिटकर, माजी आमदार बजरंग देसाई, माजी आमदार दिनकरराव जाधव, भुदरगड तालुका संघाचे




**गारगोटी : 'आदर्श माता' पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्विकारताना माजी सरपंच वृषाली देसाई. व्यासपीठावर आमदार प्रकाश आबिटकर, बजरंग देसाई, दिनकरराव जाधव, आर. एन. कारखानीस, प्रा. बाळ देसाई आदी.**

चेअरमन प्रा. बाळ देसाई उपस्थित होते.

'आदर्श माता" पुरस्कार प्राप्त शैलजादेवी कारखानीस यांनी भुदरगड तालुका ज्येष्ठ नागरीक संस्थेला ५१,००० हजार रुपयांची देणगी दिली. एस.एस.सी केंद्रात भुदरगड तालुक्यात मुलांमध्ये सर्वोच्च गुण प्राप्त अनिकेत अशोक गुरव तर मुलींमध्ये श्रुतिका अशोक सावंत व समृद्धी सुनील मांगले यांचा प्रशिस्तपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन त्यांना प्रोत्साहीत केले. प्रास्ताविक संस्थाध्यक्ष आर. एन. कारखानीस यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांनी करून दिला. स्वागत गव्हाणकर संगीत वृंद गारगोटी यांनी, सूत्रसंचलन टी. बी. पाटील यांनी केले.

कार्यक्रमास जि. प. माजी उपाध्यक्ष बी एस देसाई, कॉम्रेड दत्ता मोरे, सभापती स्नेहल परीट, महाराष्ट्र जेष्ठ संघाचे वाय एम चव्हाण, सचिव अनुजम खान, मानसिंग जगताप, बी. बी. साळोखे, ग्रामपंचायत सदस्य स्नेहल कोटकर, मेघा देसाई, अमित देसाई उपस्थित होते. आभार बी. बी. साळोखे यांनी मानले.

# आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठच्या भौतिकशास्त्र विभागात १० जानेवारीपासून दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद घेण्यात आली. परिषदेमध्ये देश-विदेशातील एकूण १२ तज्ज्ञ व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले. दीडशेहून अधिक सहभागी संशोधकांनी त्यांचे संशोधन भित्तीपत्रक स्वरूपात सादर केले.

या भित्तीपत्रकाचे परीक्षण भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विजया पुरी आणि रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. आर. एम. माने यांनी केले.

अखेरच्या सत्रात पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. जे. फुलारी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल परिषदेचे संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर व विभागातील इतर शिक्षक, संशोधक विद्यार्थी आणि सहभागी संशोधकांचे अभिनंदन केले. तसेच भारताच्या पंतप्रधानांनी पाठवलेल्या संदेशाचा संदर्भ देऊन युवकांनी त्यांचे संशोधन समाजकल्याणासाठी वापरावे, असे आवाहन केले.

पारितोषिक विजेते कुणाल बोरसे, अमित भोसले, एस. कोटरेश, डॉ. गणेश आगवणे, सत्यजित पाटील, अखिलेश पाटील यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान अधिशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. नीलेश तारवाळ आदी मान्यवर उपस्थित होते. परिषदेचे संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांनी आभार मानले.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्रातर्फे प्रवेश प्रक्रिया सुरू

**शिवाजी विद्यापीठ**

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे एम.ए. (इंग्रजी), एम.ए. (अर्थशास्त्र), एम. एस्सी. (गणित), एम. कॉम. (व्हॅल्यूएशन ऑफ रिअल इस्टेट) या पदव्युत्तर विषयांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ७७ अभ्यास केंद्रांमध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना प्रवेशित होता येणार आहे.

www.unshivaji.ac.in या संकेतस्थळावर 'डिस्टन्स एज्युकेशन' या लिंकवर ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी माहिती पुस्तिका पाहूनच विद्यार्थ्यांनी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड तयार करून रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. प्रथम वर्ष नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करताना ऑनलाईन अथवा ऑफलाईन शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे बँकेची कागदपत्रे सोबत ठेवावीत. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करण्याची मुदत नियमित शुल्कासह १ फेब्रुवारी पर्यंत, विलंब शुल्कासह ९ फेब्रुवारी, तर १५ फेब्रुवारीपर्यंत अतिविलंब शुल्क असल्याचे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी स्पष्ट केले आहे.

Kolhapur Kolhapur-Today
13/01/2019 Page No. 1

पुढारी

# बिंदुनामावली तपासणी शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकपदांच्या भरतीसंदर्भात शिवाजी विद्यापीठाने शिक्षकपदांच्या बिंदुनामावली सुधारित आकृतिबंध व मराठा आरक्षणासाठीची शासनाने केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी युध्दपातळीवर सुरू केली आहे. याबाबत प्रशासनाच्या वतीने तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयामधील बिंदुनामावली तपासण्यासाठी उपकुलसचिव श्रेणीच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तीन पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून दि. १४ व १५ जानेवारी रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, दि.१६ व १७जानेवारी रोजी सातारा व सांगली जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी होणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव दिली आहे. राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार बिंदुनामावली तपासणी मोहीम हाती घेतली आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2019
तरुण भारत

# मराठी जैन साहित्य ग्रंथाचे बुधवारी प्रकाशन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि भारतीय ज्ञानपीठ नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. गोमटेश्वर पाटील लिखीत 'मराठी जैन साहित्य' ग्रंथाचे प्रकाशन विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. शाहू स्मारक येथे बुधवारी १६ रोजी दुपारी ४ वाजता प्रकाशन सोहळा होणार आहे.

जैन साहित्य अभ्यासक प्रा. महावीर कंडारकर, डॉ. महावीर शास्त्री, भारतीय ज्ञानपीठचे प्रतिनिधी संजय दुबे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी ग्रंथ प्रकाशनास उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2010
लोकसत्ता

# डॉ. एस. आर. यादव यांचा सन्मान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. श्रीरंग रामचंद्र यादव यांना इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन यांच्या वतीने मानाचा डॉ. व्ही. पुरी स्मृती



पुरस्कार तसेच वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेद्वारे डॉ. वा. द. वर्तक वनमित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. एस. आर. यादव हे २०१६ साली शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले. त्यानंतरही त्यांनी त्यांचे संशोधनाचे काम सुरूच ठेवले. त्यांचे आजपर्यंत २६० पेक्षा अधिक शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या नावावर ९ संशोधनात्मक ग्रंथ असून प्रामुख्याने वनस्पती वर्गीकरण आणि वनस्पतीची गुणसूत्र यावर त्यांनी विशेष संशोधन केले आहे. अध्यापनाच्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी २५ पेक्षा अधिक पीएच.डी. व ११ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना एम.फील. साठी सफलतापूर्वक मार्गदर्शन केले आहे. देशभरातील नॅशनल अकॅडेमी ऑफ सायन्स, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडेमी, महाराष्ट्र अकॅडेमी ऑफ सायन्स या संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त असणारे शिवाजी विद्यपीठातील ते एकमेव प्राध्यापक आहेत.